# दैनिक महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे   सपादक बदूभाऊ इगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■ शुक्रवार दि. 08 ऑगस्ट २०२५ ■ वर्ष : २ रे ■ अंक : 89 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935


# अमेरिकन कर कात्रीत कपडा उद्योग

**भारतीय छोट्या कंपन्यांसाठी मृत्यूची घंटा ठरू शकतो : एईपीसी ■ सरकारकडून तत्काळ आर्थिक मदतीची मागणी**

**नवी दिल्ली** : ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर ५० टक्के कर दुप्पट करणे सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांसाठी, विशेषतः अमेरिकन बाजारपेठेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या उद्योगांसाठी मृत्यूची घंटा ठरेल. त्यामुळे सरकारने तत्काळ आर्थिक मदत करावी, असे कपड्यांच्या निर्यातदारांची संघटना 'एईपीसी'ने गुरुवारी म्हटले आहे.

केंद्रित कपड्यांच्या निर्यात प्रोत्साहन परिषदेचे (एईपीसी) अध्यक्ष सुधीर शेखरी म्हणाले की, अमेरिकेची वरील घोषणा ही कामगार-केंद्रित निर्यात उद्योगासाठी एक मोठा धक्का आहे. उद्योग हे सहन करू शकत नाही. मला खात्री आहे की सरकारला हे देखील कळले असेल की शुल्कातील ही अवास्तव वाढ सूक्ष्म आणि मध्यम वस्त्र उद्योगांसाठी - विशेषतः जे प्रामुख्याने अमेरिकन बाजारपेठेत विक्री करतात, त्यांच्यासाठी मृत्यूची घंटा ठरेल, जोपर्यंत सरकार या उद्योगाला थेट आर्थिक मदत देणार



नाही, असे ते म्हणाले.

भारतीय तयार कपड्यांच्या निर्यातीसाठी अमेरिका ही एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. २०२४ मध्ये भारताच्या एकूण कपड्यांच्या निर्यातीपैकी अमेरिकेचा हिस्सा ३३ टक्के आहे. २०२४-२५ मध्ये, भारताच्या या क्षेत्रातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत कपड्यांपासून बनवलेले (२.७ अब्ज अमेरिकन डॉलर), कपड्यांपासून बनवलेले (२.७ अब्ज अमेरिकन डॉलर) कपडे आणि कापड (३ अब्ज अमेरिकन डॉलर) यांचा समावेश आहे.

अमेरिकेच्या कपड्यांच्या आयात बाजारपेठेत भारताची उपस्थिती वाढली आहे. २०२० मध्ये त्याचा वाटा ४.५ टक्क्यांवरून २०२४ मध्ये ५.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे आणि अमेरिकेला जाणाऱ्या अव्वल आरएमजी निर्यातदारांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे, असे सेखरी म्हणाले.

६ ऑगस्ट रोजी वॉशिंग्टनने सर्व भारतीय आयातीवर २५ टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली, ज्यामध्ये सध्याच्या २५ टक्के शुल्काव्यतिरिक्त एकूण कर २७ ऑगस्टपासून ५० टक्के झाला आहे. व्हाईट हाऊसने म्हटले आहे की हे उपाय भारताने रशियन तेलाची सतत खरेदी करत राहिल्याने प्रत्युत्तर म्हणून आहेत.

## कापड, चामड्याच्या कंपन्यांचे समभाग घसरले

**नवी दिल्ली** : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन तेलाच्या आयातीमध्ये वाढ केल्यामुळे भारतीय वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादल्यानंतर गुरुवारी कापड आणि चामड्याशी संबंधित शेअर्समध्ये घसरण झाली.

बीएसईवर अरविंद लिमिटेडचा शेअर २.६४ टक्के, केपीआर मिलचा शेअर २.२५ टक्के, इंडो काउंट इंडस्ट्रीजचा शेअर २.१८ टक्के, पर्ल ग्लोबल इंडस्ट्रीजचा शेअर १.९८ टक्के, लक्स इंडस्ट्रीजचा शेअर १.३८ टक्के, पेज इंडस्ट्रीजचा शेअर १.१६ टक्के आणि डॉलर इंडस्ट्रीजचा शेअर ०.५६ टक्के घसरला.

लेदर स्टॉकमध्ये एकेआय इंडिया ४.७३ टक्के, झेनिथ एक्सपोर्ट्सचा शेअर ४.११ टक्के,



खादिमचा शेअर १.७७ टक्के, सुपरहाऊस लिमिटेडचा शेअर १.२४ टक्के आणि मेट्रो ब्रँड्सचा शेअर १.१३ टक्के घसरला. तसेच, झील ॲक्वा ३.८१ टक्क्यांनी, ॲपेक्स फ्रोझन फूड्स २.९८ टक्क्यांनी, अवंती फीड्स (२.२७ टक्के) आणि वॉटरबेस (२ टक्के) यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली.

# सोन्याचा भाव विक्रमी ३,६०० रुपयांनी वाढला

## सोने १,०२,६२० रुपये प्रति दहा ग्रॅमवर

**नवी दिल्ली** : अमेरिकन प्रशासनाने भारतीय आयातीवर २५ टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केल्यानंतर गुंतवणूकदारांनी सुरक्षित मालमत्तेत गुंतवणुकीकडे वळल्याने गुरुवारी राष्ट्रीय राजधानीत सोन्याच्या किमती ३,६०० रुपयांनी वाढून १,०२,६२० रुपयांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचल्या. ऑल इंडिया सराफा असोसिएशनच्या मते, ९९.९ टक्के शुद्ध मौल्यवान धातूचा भाव बुधवारी ९९,०२० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाला.

राष्ट्रीय राजधानीत, ९९.५ टक्के शुद्ध सोन्याचा भाव गुरुवारी ३,६०० रुपयांनी वाढून १,०२,२०० रुपये प्रति १० ग्रॅम (सर्व कर समाविष्ट) या नव्या उच्चांकावर पोहोचला. मागील बाजार बंदच्या वेळी तो ९८,६०० रुपये प्रति १० ग्रॅमवर स्थिरावला होता.

पारंपरिक सुरक्षित मालमत्तांची मागणी वाढल्याने व्यापाराच्या चिंता वाढल्याने गुरुवारी सोन्याचे भाव आठवड्यातील सर्वाधिक वाढले. एमसीएक्सवर, ऑक्टोबर



### सुरक्षित मालमत्तेतील गुंतवणुकीचा परिणाम

करारांसाठी सर्वाधिक व्यापार झालेल्या मौल्यवान धातूच्या वायदा भावात ८९३ रुपये किंवा ०.८८ टक्के वाढ झाली आणि दिवसभरात १,०२,१५५ रुपये प्रति १० ग्रॅमचा नवीन उच्चांक गाठला. त्यानंतर, डिसेंबर करारांमध्ये ८८० रुपये किंवा ०.८६ टक्क्यांनी वाढ झाली आणि तो आतापर्यंतचा उच्चांक रु. शेअर बाजारात प्रति १० ग्रॅम १,०३,०४७ रुपये.

दरम्यान, न्यू यॉर्कमध्ये स्पॉट गोल्ड ९.७६ डॉलर किंवा ०.२९ टक्क्यांनी वाढून ३,३७९.१५ डॉलर प्रति औंस झाला.

### अनोखे रक्षाबंधन



जम्मू येथे रक्षाबंधनानिमित्त सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना राखी बांधताना स्थानिक महिला.

# पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात डॉक्टरला मारहाण

**डोंबिवली** : डोंबिवलीतील पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात एका डॉक्टरला मारहाण झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी घडली. रुग्णालयात बेड उपलब्ध नसल्याने रुग्णाच्या संतप्त नातेवाईकाने डॉक्टरला मारहाण केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तापाने फणफणत असलेल्या एका रुग्णाला त्याचे नातेवाईक उपचारासाठी शास्त्रीनगर रुग्णालयात घेऊन आले होते. त्यांनी रुग्णाला दाखल करून घेण्याची विनंती केली.

मात्र, कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरने रुग्णालयातील सर्व बेड भरलेले असून, एकही बेड रिकामा नसल्याचे सांगितले. सध्या उपलब्ध असलेल्या बेडवर इतर रुग्णांवर उपचार सुरू आहेत, त्यामुळे तुम्ही रुग्णाला उपचारासाठी कळवा येथील रुग्णालयात घेऊन जा, असा सल्ला त्यांनी दिला.

डॉक्टरांचे हे म्हणणे ऐकून रुग्णाच्या नातेवाईकाचा पारा चढला. बेड उपलब्ध करून न दिल्याच्या रागातून त्याने थेट डॉक्टरलाच मारहाण करण्यास सुरुवात केली. यामुळे रुग्णालयामध्ये घबराट पसरली.

या अनपेक्षित हल्ल्यामुळे रुग्णालयात एकच गोंधळ उडाला.

घडलेल्या प्रकारानंतर पीडित डॉक्टरने विष्णुनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. मारहाण करणाऱ्या रुग्णाच्या नातेवाईकाविरोधात त्यांनी तक्रार दाखल केली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

## दिव्यांगांसाठी फूटपाथ आवश्यक

### न्यायालयाने केंद्र सरकारला मार्गदर्शक तत्त्वे बनवण्याचे दिले आदेश

**नवी दिल्ली** : दिव्यांगांसाठी सुरक्षित आणि सुलभ पदपथ सुनिश्चित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला चार आठवड्यांच्या आत राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र सरकार यात अपयशी ठरले तर न्यायालय स्वतः मार्गदर्शक तत्त्वे तयार करेल, अशा शब्दांतही सुप्रीम कोर्टाने केंद्राचे कान टोचले आहेत. डॉ. एस. राजशेखरन यांनी देशातील पदपथांची दयनीय अवस्था आणि अतिक्रमण याला आव्हान दिले होते, त्यावर सुप्रीम कोर्टाने हा आदेश दिला आहे.

देशातील सर्व नागरिकांना, विशेषतः अपंग आणि वृद्धांना सुरक्षित पदपथ उपलब्ध करून देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला चार आठवड्यांच्या आत अशी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यास सांगितले आहे, ज्यामुळे देशभरातील सर्व पदपथ सुलभ आणि अतिक्रमणमुक्त होतील. याचिकाकर्त्याने म्हटले की, "देशात अनेक ठिकाणी पदपथ नाहीत आणि जिथे ते आहेत तिथे ते तुटलेले आहेत किंवा अतिक्रमणाचे बळी आहेत. यामुळे केवळ अपंगांना हालअपेष्टा सहन कराव्या लागतात.

# पृथ्वीराज चव्हाण यांना १० कोटींची मानहानीची नोटीस

**मुंबई** : माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आतंकवादासाठी 'भगवा' शब्द वापरू नये, त्याऐवजी 'सनातनी आतंकवाद' म्हणा, असे विधान केले होते. सनातन संस्थेला दहशतवादी संबोधल्याने सनातन संस्थेने पृथ्वीराज चव्हाण यांना दहा कोटी रुपयांच्या मानहानीची नोटीस पाठवली आहे. तसेच बिनशर्त माफी मागण्याची मागणीही केली.

मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी सात आरोपींची 'एनआयए'च्या विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. यानंतर काँग्रेसने 'भगवा

### सनातन संस्थेला दहशवादी म्हटल्याप्रकरणी कायदेशीर कारवाईचा इशारा



#### नोटिशीत काय म्हटले?

पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यामुळे सनातन संस्थेची प्रतिमा मलीन झाली असून हजारो साधकांच्या भावना दुखावल्या आहेत. ही नोटीस मिळूनही उत्तर न दिल्यास चव्हाण यांच्यावर फौजदारी आणि दिवाणी खटले दाखल करण्यात येणार असल्याचे नोटिशीत म्हटले आहे. तसेच पृथ्वीराज चव्हाण यांनी १५ दिवसांच्या आत लेखी माफी मागणे, मूळ मुलाखतीइतक्याच प्रसिद्धीने ती माफी प्रसिद्ध करणे, भविष्यात कोणतीही बदनामीकारक विधाने न करणे आणि १० हजार रुपये कायदेशीर खर्च भरपाई देणे, अशा मागण्या या नोटिशीत करण्यात आल्या आहेत.

दहशतवाद' म्हणत हिंदूंना बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला होता. यावरून काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी 'भगवा' हा महाराष्ट्राच्या चौदा कोटी जनतेसाठी पवित्र शब्द आहे. हा शिवछत्रपतींच्या ध्वजाचा रंग आहे, तो आतंकवादाला जोडू नका, त्याऐवजी 'सनातनी आतंकवाद' म्हणा, असे म्हटले होते.

सनातन संस्थेला 'दहशतवादी' संबोधल्यामुळे सनातन संस्थेने पृथ्वीराज चव्हाण यांना दहा कोटींची मानहानीची नोटीस पाठवली आहे. पृथ्वीराज चव्हाणांचे वक्तव्य खोटे, बिनबुडाचे आणि दिशाभूल करणारे असल्याचे संस्थेने म्हटले आहे. सनातन संस्थेची बिनशर्त माफी मागावी अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा इशाराही या नोटिसीतून देण्यात आला आहे. सनातन संस्थेचे विश्वस्त वीरेंद्र मराठे यांच्यावतीने ही मानहानीची नोटीस पाठवण्यात आली आहे.

## देशातील विमानतळांना दहशतवादी हल्ल्याचा धोका

### 'बीसीएएस'कडून सुरक्षेच्या सूचना

**नवी दिल्ली** : दहशतवादी हल्ल्याच्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर देशभरातील विमानतळांवर हाय अलर्ट जाहीर करण्यात आला. नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, दहशतवादी किंवा समाजविरोधी घटकांकडून धोका असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. तसेच सर्व विमानतळांवरील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली असून प्रत्येक हालचालीवर सुरक्षा यंत्रणा बारकाईने लक्ष ठेवून आहे.

यासंदर्भात नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने सूचना जारी केल्या आहेत. त्यात असे म्हटले आहे की, केंद्रीय सुरक्षा यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, सर्व यंत्रणांना देशातील सर्व विमानतळ, धावपट्ट्या, एअरफील्ड, हवाई दल स्थानके आणि हेलिपॅड्सवरील सुरक्षा वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दहशतवादी देशातील विमानतळांवर हल्ला करण्याची शक्यता आहे.

### समन्वय ठेवा

पाकिस्तानी दहशतवादी गटाच्या कारवायांशी संबंधित विशिष्ट माहितीच्या आधारे हा अलर्ट जारी करण्यात आला आहे. ४ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या या आदेशात 'बीसीएएस'ने असेही म्हटले आहे की, स्थानिक पोलीस, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, गुप्तचर विभाग आणि इतर संबंधित एजन्सीशी समन्वय राखला पाहिजे. दरम्यान, विमानतळ टर्मिनल, पार्किंग आणि इतर संवेदनशील भागांत गस्त वाढवण्यात यावी.

**४,००० विद्यार्थ्यांसाठी भव्य पर्यावरणपूरक गणेश कार्यशाळा**

# पालिकेमार्फत 'हरित बाप्पा/फलीत बाप्पा' संकल्पना

**डोंबिवली** : यंदाचा गणेशोत्सव अवघ्या २० दिवसांवर आला आहे. या गणेशोत्सवाची तयारी घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी सुरू झाली आहे. गणेशोत्सवाबरोबरच पर्यावरण नावाचे रक्षण महत्त्वाचे बनले आहे. त्यामुळे आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, पर्यावरण संवर्धनाचा संदेश घराघरात पोहोचावा या उद्देशाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका 'हरित बाप्पा/फलीत बाप्पा' ही अभिनव संकल्पना राबवत आहे.

या अंतर्गत, महानगरपालिका आणि एज्युकेशन टुडे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, १२ ऑगस्ट रोजी एका भव्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत सुमारे ४,००० शालेय विद्यार्थी सहभागी होऊन स्वतःच्या हाताने शाडू मातीची गणेशमूर्ती साकारणार आहेत.

या उपक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत कार्यशाळेच्या प्रकल्प प्रमुख तथा कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे यांनी सांगितले की,




ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी एक समृद्ध अनुभव ठरेल. या माध्यमातून विद्यार्थी शाडू माती आणि नैसर्गिक रंगांचा वापर शिकतील, तसेच त्यांच्यात पारंपारिक कला, सांस्कृतिक मूल्ये आणि निसर्ग संवर्धनाची जाणीव निर्माण होईल.

### विद्यार्थ्यांच्या हातून साकारणार बाप्पा

ही कार्यशाळा डोंबिवली पूर्वेकडील वै.ह.भ.प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील कै. सुरेंद्र वाजपेयी सभागृहात दोन सत्रांत होणार आहे. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना श्रीगणेशाची मूर्ती बनवण्यासाठी लागणारी शाडू माती महानगरपालिकेतर्फे पुरवली जाणार आहे. शालेय विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या पालकांपर्यंत आणि शिक्षकांपर्यंत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश प्रभावीपणे पोहोचवणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

### "घरोघरी तिरंगा" अभियानांतर्गत सायकल रॅली

शासनाच्या "घरोघरी तिरंगा" उपक्रमांतर्गतही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी रांगोळी काढणे, राखी तयार करणे आणि देशाच्या जवानांना पत्र लिहिणे यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. या अभियानाचा भाग म्हणून, येत्या रविवारी, १० ऑगस्ट रोजी सकाळी ६:३० वाजता एका सायकल रॅलीचे आयोजित केली. या "घरोघरी तिरंगा" अभियानात नागरिकांनी पुढाकार घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहनही आयुक्त अभिनव गोयल यांनी केले.

> सार्वजनिक मंडळांनी शक्य असल्यास ६ फुटांपेक्षा कमी उंचीच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करावी. तसेच, विसर्जनासाठी कृत्रिम तलावांचा वापर करावा, जेणेकरून नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित होणार नाहीत. सर्वांनी मिळून हा गणेशोत्सव शक्य तितका पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा.
>
> – **अभिनव गोयल**, आयुक्त महानगरपालिका

### अमेरिकन वस्तूंवर 'जशास तसा' कर लावावा – शशी थरूर

**नवी दिल्ली** : अमेरिका आपल्याला आर्थिक दबावाखाली झुकवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे भारताने त्यांना 'जशास तसे' उत्तर देणे गरजेचे आहे. भारताने अमेरिकन वस्तूंवर 'जशास तसा' कर लावावा, अशी मागणी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी केली.

अमेरिकेच्या एकतर्फी व धमकी देण्याच्या कृतीवर नाराजी व्यक्त करताना थरूर म्हणाले की, भारताला कोणीही कमजोर देश समजू नये. आम्ही समान चर्चेवर विश्वास ठेवतो, याचा अर्थ दबाव आणून चर्चा योग्य नाही, असे ते म्हणाले.

## संपादकीय

### कृष्णा–मोहम्मद साथसाथ!

वनडे किंवा टी–२० लढतींमधील एकेका चेंडूचा थरार, रोमांच फिका पडावा, अशी झुंज सोमवारी भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील पाचव्या व अखेरच्या सामन्यात शेवटच्या दिवशी क्रिकेट रसिकांनी अनुभवली. हा सामना जिंकून मालिका बरोबरीत सोडविताना मोहम्मद सिराज व प्रसिद्ध कृष्णा यांच्या तोफा एकाचवेळी धडाडल्या आणि चमत्कार घडला. विजयश्रीला पायाशी लोळण घ्यायला लावली. हे सारे अद्भुत व अकल्पनीय होते. शेवटच्या दिवशी विजयासाठी हव्या अवघ्या ३५ धावा इंग्लंडचे पाच फलंदाज सहज काढतील, अँडरसन–तेंडुलकर चषक पटकावतील, असेच अनेकांना वाटत होते. परंतु, क्रिकेटमधील अनिश्चितता सिद्ध करण्यासाठी भारतीय संघ भिडला होता. अकल्पित घडले. भारताच्या कसोटी इतिहासातील सर्वात कमी, ६ धावांनी विजयाची नोंद झाली. ही मालिका इतिहासात नोंद होईल. पाचही कसोटी सामने पाचव्या दिवसापर्यंत रंगले. आयपीएलचा थरार पाठीवर टाकून भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडमध्ये पोहोचला, तेव्हा अपेक्षा होती की, संघाने किमान स्मरणात राहील, अशी कामगिरी केली तरी भरपूर. कारण, गौतम गंभीर हा नवा मुख्य प्रशिक्षक, रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर शुभमन गिल नवा कर्णधार. विराट कोहली, रवीचंद्रन अश्विन नाहीत. सगळे तरुण खेळाडू आणि सामना बॅझबॉल रूपाने प्रत्येक चेंडू धोपटून काढणाऱ्या इंग्लंडशी. तेव्हा, हा दौरा फारतर अनुभव देणारा असेल, असेच वाटले. मात्र, गौतम गंभीरने पोरांना सांगितले, ही 'यंग टीम' नाही, तर 'गन टीम' आहे, ही खूणगाठ बांधा. तसेच घडले. तरुण तोफांनी असा धमाका केला की, इंग्लिश संघ पुरता निष्प्रभ झाला. ही तरुण पोरे पराभवाने खचली नाहीत. उलट अधिक जोमाने उसळी मारली. परिणामी, लीड्समध्ये इंग्लंड, बर्मिंगहम येथे भारत, लॉर्डसवर इंग्लंड, मँचेस्टरला सन्मानजनक बरोबरी आणि शेवटी ओव्हलवर भारताचा दिमाखदार विजय, असा विजयाचा लंबक हेलकावत राहिला.

झटपट क्रिकेट, चौकार–षटकारांची आतषबाजी, गोलंदाजांची कत्तल यामुळे कंटाळवाणे वाटणाऱ्या कसोटी क्रिकेटला संजीवनी मिळाली. पाच दिवसांची कसोटी हेच खरे क्रिकेट असे मानणारे आता छाती पुढे काढून चालतील. रोज तीस–तीस षटकांची तीन अशी पाच दिवसांत पंधरा सत्रे, क्रिकेट तंत्राचा कस, गोलंदाजांचा हात आणि फलंदाजांचे पाय यावर बेतलेले डावपेच, शारीरिक क्षमता, तसेच मानसिक कणखरपणाचा कस, इकडून तिकडे हेलकावणारे जय–पराजयाचे पारडे, असे संपूर्ण क्रिकेट म्हणजे कसोटी. त्यात हवी जिंकण्याची जिद्द, त्यासाठी प्रचंड परिश्रमाची तयारी व कमालीचा लढाऊ बाणा. तो दोन्ही संघांनी दाखविला. पाय जायबंदी असताना, ऋषभ पंत व हात गळ्यात असताना ख्रिस वोक्स संघासाठी मैदानात उतरला. २० जून ते ४ ऑगस्ट या पंचेचाळीस दिवसांत अनेक विक्रम नोंदविले गेले. खोऱ्याने धावा निघाल्या. भारताकडून बारा व इंग्लंडची नऊ, अशी तब्बल एकवीस शतके ठोकली गेली. १८ शतकी भागीदारी झाल्या. जो रूट महान खेळाडूंच्या यादीत पुढे गेला, तर शुभमन गिल, ऋषभ पंत दिग्गजांच्या पंगतीत विराजमान झाले. कर्णधाराकडून सर्वाधिक धावांच्या बाबतीत शुभमनने ग्रॅहम गुचला मागे टाकले. चार शतकांसह ७५४ धावांसह तो थोर फलंदाज डॉन ब्रॅडमननंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. मालिकेत सर्वाधिक धावांचा सुनील गावस्कर यांचा विक्रम भलेही त्याला मोडता आला नाही; परंतु स्वतः गावस्करच म्हणाले की, कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळून शुभमनची कामगिरी सरस आहे. जसप्रीत बुमराहच्या गैरहजेरीत भारतीय मारा सांभाळताना मोहम्मद सिराजची कारकीर्द बहरली. एखाद्या चुकीने, क्षणाने खेळाडूची कारकीर्द संपते. जावेद मियांदादने ठोकलेल्या षटकाराने चेतन शर्माची कारकीर्द संपली. ओव्हलवर हॅरी ब्रुकचा झेल घेताना सिराज सीमारेषेबाहेर गेला तो असाच क्षण होता. त्या चुकीची भरपाई लढवय्या सिराजने थेट सामना जिंकून केली. भारतीय संघाच्या या कामगिरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, SENA नावाच्या दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया टापूमधील भारतीय संघाची धडक. वेगवान खेळपट्ट्यांच्या या टापूत सामना अनिर्णीत राखला, तरी मोठे समाधान. इंग्लंड दौऱ्याने ती व्याख्या पार बदलून टाकली. तुमच्या रणांगणावरही आम्हीच जिंकू, भारतीय क्रिकेटची पताका उंचच उंच फडकत ठेवू, हा संदेश 'गन टीम'ने क्रिकेटच्या जन्मभूमीवर कोरून ठेवला.

# अखेर सिहोरा – चांदपूर मार्गावरील रस्त्याचे बांधकाम सुरू

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा**



**सिहोरा :-** सिहोरा चांदपूर व मुरली मार्गावरील सिमेंट रस्त्याच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे.भर पावसात रस्त्याचे खोदकाम केल्यामुळे वाहन चालक व प्रवाशांना त्रास सहन करावे लागणार असल्याची चर्चा चांगलीच जोर धरून होती.रस्त्यावर टाकण्यात आलेल्या गिट्टीमुळे अपघाताच्या धोका वाढला होता. वाहन चालक व प्रवाशांच्या मनात असंतोष खदखदत होता.सुरक्षिततेच्या दृष्टीने परिस्थिती नागरिकांसाठी धोकादायक ठरली होती.आरोप प्रत्यारोपाचे वारे वाहू लागले होते.यात शासन प्रशासन व लोकप्रतिनिधींचे सुद्धा लक्ष वेधण्यात आले होते.या रस्ता बांधकामाकडे यंत्रणेने तडकाफडकी दखल घेतली व बांधकाम धडाक्यात सुरु आहे.वाहन चालक व प्रवासांच्या मनात आनंद संचारला असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

सिहोरा – चांदपूर ते मुरली मार्गावर सिमेंट काँक्रीटचे बांधकाम सुरू आहे. सदर रस्ता हा काटी ते लेंडेझरी दरम्यान अंदाजे 80 ते 85 किलोमीटर लांब सिमेंट काँक्रीट ने तयार करण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यासाठी 350 कोटी रुपयाचा निधी सुद्धा मंजूर करण्यात आला असल्याचे वृत्त पुढे आले आहे. कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून सदर कामाला गती देण्याचे प्रयत्न सुरूच आहेत.

सदर रस्ता बांधकामाला गती देण्यात आल्यामुळे व रस्त्याचे बांधकाम धडाक्यात सुरू असल्यामुळे वाहन चालक व प्रवासांच्या आनंद द्विगुणीत झाल्याचे चित्र दिसत आहे.सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे वाहन चालक व प्रवासी धोका टळला असल्याचा अनुभव घेत आहेत.सदर काम हे मुदतीत होणे आवश्यक असले तरी रस्ता बांधकाम करताना रहदारीसाठी मार्ग मोकळा ठेवूनच करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे.

# धान उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट बोनस द्या ; मोतीलाल ठवकर

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा**

**सिहोरा :-** देशाचा पोशिंदा समजल्या जाणाऱ्या व धान खरेदी केंद्रावर नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना बोनसचा सरसकट लाभ देण्यात यावा अशी मागणी भारतीय किसान संघाचे मोतीलाल ठवकर यांनी एका प्रसिद्धी पत्रका अन्वये केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणूकपूर्व तसेच निवडणुकीनंतर विधानसभेच्या नागपूर हिवाळी अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चेदरम्यान ज्या शेतकऱ्यांनी शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर धान विक्री केली असेल किंवा नसेल पण नोंदणी केलेल्या सर्वच धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 20 हजार रुपये व 2 हेक्टर आर मर्यादेपर्यंत बोनस (प्रोत्साहन राशी) देण्यात येईल, असे जाहीर केले होते. मात्र बोनस देण्याची वेळ आली असता ज्या शेतकऱ्यांनी शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री केली. अशाच शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर बोनसची रक्कम जमा करण्यात आल्यामुळे इतर शेतकऱ्यांत संभ्रम निर्माण झाला आहे. शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना बोनसचा लाभ देऊन मुख्यमंत्र्यांनी आश्वासनाची पूर्तता करावी, अशीही मागणी होत आहे. जिल्ह्यात खरीप हंगामातील मुख्य पीक धान असल्यामुळे धान उत्पादक जिल्हा म्हणून राज्यात सुपरिचित आहे. बि–बियाणे, खत, कीटकनाशक व मजुरीत प्रचंड प्रमाणात वाढ तर धानावर रोग आणि किडीचा प्रादुर्भाव यामुळे उत्पादनात घट आणि शासकीय धान खरेदी केंद्र उशिरा सुरु होत असल्यामुळे उसनवार व वित्तीय संस्थांचे देणे देण्यासाठी खाजगी व्यापाऱ्यांचा आश्रय



द य ा व ा लागतो. व्यापारी हमीभावा पेक्षा कमी दराने धान खरेदी करून धान उत्पादकांची पिळवणूक करतात. तर लागवडीपेक्षा उत्पन्न कमी त्या मानाने खर्च अधिक यामुळेच शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतो. आत्महत्येच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे. धान उत्पादक शेतकऱ्याची दैनावस्था शासनाचे निदर्शनास आल्यामुळेच मागील 5 ते 7 वर्षापासून शासनाकडून धानाला बोनस जाहीर केला जातो. तथा 31 मार्च पर्यंत धान उत्पादकांचे बँक खात्यात रक्कम जमा केली जाते.हे येथे उल्लेखित आहे. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यास ज्या शेतकऱ्यांनी शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री केली असेल किंवा नसेल अशा सर्व धान उत्पादक शेतकऱ्याना हेक्टरी 20 हजार 2 हेक्टर मर्यादेपर्यंत बोनस (प्रोत्साहन राशी) देण्यात येईल, असे जाहीर केले होते. अनेक धान उत्पादकांनी आभासी पद्धतीने धान खरेदी केंद्रावर नोंदणीही केली. परंतु किड्यांचा प्रादुर्भाव व त्यातच नापिकी यामुळे शेतकऱ्यांनी धानाची विक्री केली नाही. पण बोनस देण्याची वेळ आली असता ज्या शेतकऱ्यांनी धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री केली आहे. अशाच शेतकऱ्याचे बँक खात्यात जिल्हा पणन अधिकाऱ्याकडून बोनसची रक्कम जमा केली असल्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मुख्यमंत्र्यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन पाळून धान खरेदी केंद्रावर नोंदणी करणाऱ्या शेतकऱ्यांना सरसकट बोनसचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी भारतीय किसान संघाचे मोतीलाल ठवकर व धान उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

## तुमसर तालुक्यातील कुख्यात 'हातभट्टीवाल्या'वर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाई; जिल्हा कारागृहात रवानगी. पोलीस प्रशासनाची चालू वर्षातील नववी धडक कारवाई.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**तुमसर –** तुमसर तालुक्यातील चिखला येथील कुख्यात हातभट्टीवाला उमेश भिमराव मेश्राम (वय ४२) याच्यावर महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायद्यान्वये (एम.पी.डी.ए.) स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने त्याला भंडारा जिल्हा कारागृहात रवाना करण्यात आले. या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायात सक्रिय असणाऱ्या गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उमेश मेश्राम हा गोबरवाही पोलीस स्टेशन हद्दीतील एक सराईत गुन्हेगार आहे. तो गेल्या ५ वर्षांपासून मोहफुलाची हातभट्टी दारू गाळण्याच्या आणि विकण्याच्या व्यवसायात सक्रिय होता. त्याने गुंड प्रवृत्तीच्या लोकांना सोबत घेऊन परिसरात स्वतःची 'हातभट्टीवाला' अशी ओळख निर्माण केली होती. त्याच्यावर गोबरवाही पोलीस ठाण्यात हातभट्टी दारूची निर्मिती आणि विक्री करण्यासंबंधी अनेक गुन्हे दाखल आहेत. उमेश मेश्राम याच्या कृत्यांमुळे चिखला आणि आजूबाजूच्या परिसरातील तरुण पिढी दारूच्या आहारी जात होती. यातून गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली होती. परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याने या समाजविघातक व्यक्तीवर कठोर कारवाई करणे आवश्यक बनले होते. या पार्श्वभूमीवर, जिल्हा पोलीस अधीक्षक नूरूल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली उमेश मेश्राम विरोधात एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला. या प्रस्तावाला जिल्हाधिकारी संजय कोलते यांनी मंजुरी देत स्थानबद्धतेचे आदेश काढले. त्यानुसार, दिनांक ०६ ऑगस्ट रोजी मेश्राम याला ताब्यात घेऊन जिल्हा कारागृहात त्याची रवानगी करण्यात आली. ही जिल्हा पोलीस दलाची चालू वर्षातील नववी एम.पी.डी.ए. कारवाई आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नूरूल हसन, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीनकुमार चिंचोळकर, गोबरवाही पोलीस स्टेशनचे निरीक्षक शरद शेवाळे यांच्यासह पोहवा. राजेश पंचबुधे, अजय बारापात्रे, मंगेश गेडाम, तुषार कांबळे, गौरिशंकर कडव, लंकेश राघोर्ते, नेपाल गभणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारवाईचा बडगा यापुढेही उगारण्यात येईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## जिल्हा प्रशासनाला "मिशन आशीर्वाद" साठी राष्ट्रीय पुरस्कार

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते नवी दिल्लीत गौरव

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर)** जिल्हा प्रशासनाने सेंद्रिय शेतीच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत "मिशन आशीर्वाद" या उपक्रमासाठी "सेंद्रिय शेती उत्कृष्टता पुरस्कार" हा मानाचा राष्ट्रीय सन्मान प्राप्त केला आहे. हा पुरस्कार दुसरी शाश्वत शेती परिषद आणि पुरस्कार २०२५ या राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते जिल्ह्याच्या वतीने उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी हा पुरस्कार स्वीकारला.जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या "मिशन आशीर्वाद" या उपक्रमामुळे वाशिम




जिल्ह्याच्या सेंद्रिय शेती क्षेत्रातील कामगिरीला राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. या यशामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह आणि प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे यांचा मोलाचा सहभाग आहे.शाश्वतता महत्त्वाची आहे, इंडीॲग्री, आणि ग्रेमॅटर्स या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते."मिशन आशीर्वाद" उपक्रमाअंतर्गत वाशिम जिल्ह्यात सेंद्रिय शेती नवोपक्रम, बाजारपेठेची सशक्त जोडणी, आणि शाश्वत उत्पादन प्रणाली या घटकांमध्ये केलेल्या कार्यामुळे हा पुरस्कार प्राप्त झाला. या कार्यामुळे जिल्ह्याचा सेंद्रिय शेती आदर्श राष्ट्रीय पातळीवर उभा राहिला आहे. कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले की, हा पुरस्कार जिल्ह्यातील सेंद्रिय शेतीला नवी दिशा देणारा ठरेल आणि शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीबाबत जागृती व आत्मविश्वास निर्माण करेल.





### तहसिल कार्यालय भोकर

वेबसाईट WWW.nanded.gov.in | ई मेल tahbhokar@gmail.com
शाखा – जमाबंदी 2/ जमीन | दुरध्वनी 02462-222622
क. 2025/जमाबंदी-2/कावी | दिनांक 21/07/2025

**(जाहीर प्रगटन मार्फत तलाठी सज्जा रेणापुर )**

**विषय – मौं. रेणापुर येथील गट क्र. 143 मधील "कुळाचे नाव खंड" रकान्यातील नमुद साधे कुळ शंकर विठोबा सा.कु. 60-61 (10086) अशी नोंद कमी करणे बाबत.**

**संदर्भ – अर्जदार श्री कांतराव महादु गोरे रा. रेणापुर ता. भोकर जि. नांदेड यांचा अर्ज दिनांक 19/06/2025.**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रकाचे अनुषंगाने अर्जदार श्री कांतराव महादु गोरे रा. रेणापुर ता. भोकर यानी मौ. रेणापुर येथील गट क्र. 143 मधील "कुळाचे नाव खंड" रकान्यातील नमुद साधे कुळ शंकर विठोबा सा.कु. 60-61 (10086) अशी ही नोंद कमी करणे बाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

करीता या जाहीर प्रगटनाव्दारे मौ. रेणापुर येथील गट क्र. 154 मधील "कुळाचे नाव खंड" रकान्यातील नमुद संरक्षीत कुळ धोड्या संभ्या सा.कु. 1960-61 (10119) कुळधारक अथवा त्यांचे वारसदार किंवा इतर कोणी हितसंबंधी व्यक्ती यांना कळविण्यात येते की, सदर कुळ कमी करणे बाबत कोणाचे काही आक्षेप असल्यास अथवा हरकत असल्यास त्यांनी आपले आक्षेप 15 दिवसांच्या आंत या कार्यालयास सादर करावेत. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात नियमानुसार व गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ– भोकर
**दिनाक 21/07/2025.**

(विनोद गुंडमवार)
तहसिलदार, भोकर

1 . दैनिक
**वर्तमानपत्र ता. भोकर यांना देवुन कळविण्यात येते की, आपल्या दैनिक वर्तमानपत्रात सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.**
**(विनोद गुंडमवार) तहसिलदार, भोकर**


# दारू आणि संशयाच्या विळख्यातून कुटुंबाची सुटका; भरोसा सेल ठरला मार्गदर्शक

### पती-पत्नीमधील वाद मिटवून भंडारा पोलिसांनी तुटणारा संसार पुन्हा जोडला.

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा –.** एका क्षुल्लक कारणावरून निर्माण झालेला संशय आणि त्याला मिळालेली दारूच्या व्यसनाची जोड यामुळे तुटण्याच्या उंबरठ्यावर असलेला एका तरुण जोडप्याचा संसार भंडारा पोलिसांच्या 'भरोसा सेल'ने केलेल्या यशस्वी मध्यस्थीमुळे पुन्हा एकदा सावरला आहे. पती–पत्नीमधील वाद मिटवून आणि त्यांच्यात सलोखा घडवून आणत भरोसा सेलने एका कुटुंबाला एकत्र आणले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, कविता आणि दिनेश (काल्पनिक नावे) हे एकाच गावातील रहिवासी असून, त्यांनी २०२३ मध्ये प्रेमविवाह केला होता. त्यांच्या सुखी संसारात एका गोंडस मुलीच्या आगमनाने आणखी भर पडली. सर्व काही सुरळीत सुरू असताना, एके दिवशी पत्नीला फोनवर बोलताना पाहून पती दिनेशच्या मनात संशयाचे बीज पेरले गेले. पत्नीने दिलेले




उत्तर समाधानकारक न वाटल्याने तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. या संशयाला दारूच्या व्यसनाची जोड मिळाल्याने दिनेश पत्नी कविताला रोज शिवीगाळ आणि मारहाण करू लागला. हे प्रकरण इतके विकोपाला गेले की, एके दिवशी त्याने कविताला जीवे मारण्याची धमकी दिली. पतीच्या या त्रासाला कंटाळून आणि जीवाच्या भीतीने घाबरलेल्या कविताने अखेर भंडारा पोलीस स्टेशन गाठून पतीविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून ते तात्काळ 'भरोसा सेल'कडे वर्ग केले. भरोसा सेलच्या समुपदेशकांनी पती–पत्नी दोघांनाही दोन–तीन वेळा बोलावून त्यांचे सविस्तर समुपदेशन केले. पतीच्या मनातील संशयाचे कारण जाणून घेऊन ते दूर करण्याचा प्रयत्न केला. तसेच, पत्नीला मारहाण न करता तिच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत पतीला समजावण्यात आले. या समुपदेशनाचा सकारात्मक परिणाम झाला. आपली चूक पतीच्या लक्षात आली आणि दोघांनीही एकमेकांपासून वेगळे न होता पुन्हा एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. आज हे जोडपे आपल्या दीड वर्षांच्या मुलीसोबत पुन्हा गुण्यागोविंदाने नांदत आहे. भरोसा सेलच्या या कामगिरीमुळे एका कुटुंबाची झालेली वाताहत टळली असून, कौटुंबिक कलहांमध्ये संवाद आणि समुपदेशन किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## उपजिल्हा रुग्णालय तुमसर येथे कर्करोग शिबिर संपन्न

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा**

तुमसर, :– सुभाष चंद्रबोस उपजिल्हा रुग्णालय तुमसर येथे काल 6 ऑगस्ट रोजी जनजागृती व कर्करोग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती तुमसरचे सुभाष बोरकर यांचे हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मसुरकर होते.

या कर्करोग शिबिराला डॉ. बाळबुद्धे , स्त्रीरोग तज्ञ डॉ. वैशाली ढोके , सर्जन डॉ. प्रशांत मेश्राम , डेंटिस्ट डॉ. ज्योत्सना शिंदे, सहाय्यक अधीसेविका रंजना नंदनवार व कर्मचारी वर्ग प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. मीसुरकर यांनी कर्करोग म्हणजे काय, तसेच कर्क रोगाची लक्षणे काय व यावर करावयाची उपाय व उपचार याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. कर्करोग व जनजागृती शिबिराला रुग्ण व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

# संविधान प्रचारक, लेखक नूरखाँ पठाण यांचे बौद्धधम्म वर्षावास प्रवचन

महाराष्ट्र जीत

बोरघर / माणगांव गोरेगाव येथील ऐतिहासिक संबोधी विहारामध्ये सुरू असलेल्या वर्षावास प्रवचन मालिकेत संविधान प्रचारक, विश्लेषक, लेखक नूरखाँ पठाण यांनी प्रवचन मालिकेचे चौथे पुष्प गुंफले. सदर कार्यक्रम बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष चंद्रमणी साळवी होते. कार्यक्रमाचे नियोजन संदीप साळवी सर यांनी केले. महिला संघाचे नेतृत्व पंचशील महिला अध्यक्षा सौ. सुप्रिया साळवी, बौद्ध महासभेच्या रायगड जिल्हा अध्यक्षा प्रबोधनकार सौ. अस्मिता अनिल जाधव सचिव सौ. संघमित्रा गायकवाड यांनी केले. वक्ते नूरखाँ पठाण यांनी






संविधान एक जीवन प्रणाली या पुस्तकाचे लेखन व प्रकाशन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीने प्रेरित झालेल्या या लेखकाने बौद्ध धम्माचा चांगला अभ्यास केला आहे. संविधान पद्धती तथागतच्या काळापासून आहे. डॉ. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हा खरा बौद्ध धम्म आहे. या देशातील प्रत्येकाने या ग्रंथाचे आचरण केले तर सर्व जीवन सुखकर होईल असे सांगताना तथागतांच्या धम्म कार्यावर उद्‌बोधक असे मार्गदर्शन केले.

पंचशील बौद्धजन सेवा संघाचे अध्यक्ष विकासदादा गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धम्मसेवेत गोरेगाव येथे वर्षावास निमित्त मोठ्या प्रमाणात धम्मप्रचार होत आहे. यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक.सहभागी होत असतात. इतर धर्मीय लोक सहभाग घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला बौद्ध आणि त्याचा धम्म इतर धम्माचे व्याख्याते सांगतात त्यावेळी एक वेगळा अनुभव व आनंद मिळतो. वक्ते नूरखाँ पठाण म्हणतात संविदा पद्धती तथागतच्या काळापासून सुरू आहे. डॉ. बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने बौद्धधम्म संस्कार पद्धतीवर संविधानाची निर्मिती केली आणि ह्या देशात सुख आणि शांती निर्माण केली आहे. बौद्ध धम्म संस्कार चे मार्गदर्शन महिलाना खुप आवडले. सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले.

या कार्यक्रमाला विभागातील ज्येष्ठ समाजसेवक रामदास जाधव, बळीराम हाटे, तुकाराम लोखंडे, हिरामण महाडिक, आयु. येवले बौद्धि उपासक, अनंत लोखंडे, विजय जाधव, नीलेश महाडिक, शरद मोरे, आयु. कदम बाबा, उपस्थित होते. महिला संघाच्या संघटक सौ रेश्मा संदीप साळवी, विजया गायकवाड, रेश्मा साळवी, भारती खांबे, रेश्मा साळवी, सुनंदा मोरे, सुवर्णा हाटे जयश्री सोनवणे, प्रणाली भूषण जाधव, सौ. विशाखा साळवी, सुवर्ण अहिरे, देवळी, भारती साळवी, राजश्री साळवी, सुचिता महाडिक, सुचिता हाटे, मांगरुल येथील विद्या लोखंडे, अपर्णा लोखंडे, मीना हाटे, वत्सला हाटे बहुसंखेन महिला उपस्थित होत्या.

## मातंग समाजाने जातीच्या चौकटी बाहेर पडून रुढी परंपरेला नाकारुन तथागत बुद्ध व डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे विज्ञानवादी विचार अंगीकारणे काळाची गरज - डी.एस.नरसिंगे

### मुखेड येथे भीमशक्ती च्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील बहुजन ऐक्याचा संदेश या विषयावर जाहीर व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न.

महाराष्ट्र जीत

**नांदेड जिल्हा प्रतिनिधी - वैभव घाटे**

कामगारांच्या शोषितांच्या कष्टकऱ्यांच्या व्यथा, आपल्या लिखाणाच्या माध्यमातून जगाच्या वेशीवर टांगणारे,थोर साहित्यिक,"जग बदल बदल घालूनी घाव,सांगून गेले मज भीमराव" असे म्हणणारे साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त दि.४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:०० वाजता शहरातील सम्राट अशोका बुद्ध विहार सभागृह समता नगर,मुखेड येथे "साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील ऐक्याचा संदेश" या विषयावर सत्यशोधक समाज महासंघाचे राज्य अध्यक्ष मा.डी.एस.नरसिंगे यांच्या भव्य व्याख्यानाचे आयोजन मुखेड तालुका भीमशक्ती संघटनेच्या माध्यमातून भीमशक्ती चे तालुकाध्यक्ष आकाश कांबळे यांनी व संयोजन समितीतील डॉ.राहुल कांबळे,पी.एल दाडेराव, विनोद गजभारे,साहेबराव वाघमारे, भारत सोनकांबळे बेटमोगरेकर(पत्रकार) इत्यादीनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेवून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महामानव भारतीय संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर व साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप,धूप प्रज्वलीत करुन पुष्पमाला अर्पण करून अभिवादनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. १ ऑगस्ट २०२५ - सत्यशोधक,साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी.जयंती. वाटेगाव (सांगली) हून अनवाणी पायाने



मुंबई ते थेट मॉस्को रशियाला जाणारे अण्णाभाऊ साठे. अवघ्या जगाला अभिमानाने छाती ठोकून सांगणार व्यक्तिमत्त्व की, मी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातृभूमी वरुन आलो आहे. हे जग,ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे हे सारस्वतांना ठणकावून सांगत असतानाच एकाच वेळी ब्राह्मणशाही आणि भांडवल शाहीची लक्तरे काढणारे, जग बदल बदल घालूनी घाव सांगून गेले मज भीमराव असे म्हणणारे थोर साहित्यिक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आहेत असे उद्‌गार व्याख्याते डी.एस.नरसिंगे यांनी काढले. ते पुढे बोलतांना म्हणाले की,मातंग समाजाने जातीच्या चौकटी बाहेर पडून रुढी परंपरेला नाकारुन तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे विज्ञानवादी विचार अंगीकारणे काळाची गरज असून त्यानेच समाजाची उन्नती होईल असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष - मा.शत्रुघ्न वाघमारे (भीमशक्ती,नांदेड जिल्हाध्यक्ष), हे होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटक - भीमपुत्र मा.टेक्सास दादा गायकवाड (चित्रपट लेखक,निर्माता, दिग्दर्शक) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अड.बाबा वानखेडे (सिने अभिनेते),राहुल गायकवाड (लातूर), श्याम निलंगेकर,भारतीबाई गौतम काळे (माजी नगरसेविका,न.प. मुखेड), प्रा.उत्तमकुमार कांबळे,गौतम काळे (जिल्हाध्यक्ष रि.पा.ई.आठवले गट,नांदेड), **अनिल सिरसे (रिपब्लीकन सेना जिल्हाध्यक्ष नांदेड),हे होते.**

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक - आकाश कांबळे- (भीमशक्ती तालुकाध्यक्ष मुखेड), सुत्रसंचालन पत्रकार भारत सोनकांबळे बेटमोगरेकर व पी.एल.दाडेराव यांनी केले तर डॉ.राहुल कांबळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला महिला भगिनिंसह पुरुष बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते

## गौरव पोरवाल यांच्या रिट पिटीशन WP 23111/2025 नुसार नाविक क्षेत्रात न्यायालयिन दिलासा ; कोर्टाचे मानले आभार

महाराष्ट्र जीत

**न्यूज ब्युरो - नवी मुंबई**

ग्लोबल सीफेअरर्स युनियन ऑफ इंडिया (GSUI) ने DG शिपिंगच्या विरोधात १ ऑगस्ट रोजी जाहीर केलेल्या आदेशावर लाखो नाविकांनी समाधान व्यक्त केले. तर अनेक आधार रहित धोरण मान्यता पात्र संस्थानांवर लादले गेले . या आदेशानुसार, भारतात कोणतीही विदेशी समुद्री प्रशिक्षण संस्था किंवा त्यांचे प्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रमात अनेक अडचणी उद्‌भवतील असे सांगण्यात आले. ब्लॅकलिस्टिंग, प्रमाणपत्र अमान्य करण्याचे अधिकृत अधिकार नसताना हि डि जी शिपिंग चे धोरण मर्चंट शिपिंग कायद्याचे उल्लंघन करण्यासारखे असल्याने त्यावर नवी मुंबई येथील पत्रकार परिषदेत गौरव पोरवाल शिष्टमंडळाने चिंता व्यक्त करण्यात आली. GSUI च्या मते, या आदेशामुळे 50 हजार ते 1 लाख भारतीय सीफेअरर्सच्या करिअरवर संकट येणारी परिपत्रक अन्यायकारक असून ज्या युवकांनी भारतात असलेल्या विदेशी संस्थांकडून वैध STCW प्रमाणपत्र घेतले आहे, त्यांना याचा मोठा फटका

सरकारने भारतीय सीफेअरर्सच्या हिताचा विचार केला नाही, तर लोकशाही मार्गाने मुंबई डि जी शिपिंग कार्यालयात आंदोलन करण्यात येईल, यासाठी माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय पातळीवर नियोजन करणार असल्याचे सांगण्यात आले....नाविक कामगार नेते गौरव पोरवाल

बसत आहे... GSUI सदस्य गौरव पोरवाल यांनी सांगितले, अश्या जुलमी आदेशामुळे अनेक भारतीय सीफेअरर्सच्या भविष्यात अनिश्चितता निर्माण झाली आहे, यामुळे नाविक क्षेत्रातील घटकांच्या सर्वांगीण विकासा मध्ये बाधा येतील असे एकतर्फी धोरण आम्हाला अमान्य असून या प्रकरणी पुढील लढाई न्यायिक व लोकशाहीच्या माध्यमातून संघर्षवादी असेल यातून निर्माण होणाऱ्या कायदा सुव्यवसथेच्या परिणामा बाबत डी जि शिपिंग जवाबदार असेल असा इशारा ही देण्यात आला. यावेळी पत्रकार परिषदेत कामगार नेते गौरव पोरवाल, ऍडव्होकेट विमल झा, मिस्टर सिन्हा , रमेश गोरे व आदी कायदेशीर तज्ञ शिष्ट मंडळ उपस्थिती होते



## आंतरराष्ट्रीय खरेदीदार व विक्रेता मेळावा मुंबईत संपन्न

### महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ आणि भारतीय निर्यात संघटना महासंघ यांचा पुढाकार

महाराष्ट्र जीत

**मुंबई (शांताराम गुडेकर)**

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ आणि भारतीय निर्यात संघटना महासंघ यांच्याद्वारे सेंट रेजिस हॉटेल, परेल येथे आंतरराष्ट्रीय खरेदीदार, विक्रेता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उदघाटन माननीय आमदार उदयजी सामंत (उद्योग व मराठी भाषा मंत्री, महाराष्ट्र राज्य) यांनी केले. यावेळी विकास आयुक्त (उद्योग आणि निर्यात) दीपेंद्रसिंह कुशवाह (IAS) आणि महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालिका प्रशाली दिघावकर उपस्थित होत्या.

या मेळाव्यात किमान ५० विविध देशातील विक्रेते आणि खरेदीदार यांच्याबरोबरच भारतातील वेगवेगळ्या राज्यातील उद्योजकही उपस्थित होते. याप्रसंगी १५०० च्या आसपास परदेशी व भारतीय आयात निर्यातदार यांच्या गाठीभेटी आणि चर्चा झाल्या. याचा फायदा नक्कीच या क्षेत्रात नव्यानं पदार्पण करणाऱ्या भारतीय निर्यातदारांना होईल असे मत मंत्री महोदयांनी व्यक्त केले.याच मेळाव्यात ए. के. मुनशी योजना संस्थेच्या जे. टी. शेठ मंदबुंदी विकास केंद्र या कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींनी बनविलेल्या ज्युट बॅग्स सर्व परदेशी पाहुण्यांना भेट स्वरूपात देण्यात आल्या. यामुळे भविष्यात मंदबुद्धी विकास केंद्राच्या प्रशिक्षणार्थींना याचा फायदा होईल. असे मत ए. के. मुनशी योजना संस्थेच्या अध्यक्षा भारती गांजावाला यांनी याप्रसंगी व्यक्त केले.



या मेळाव्याचे विजन चेअरमन परेश मेहता यांच्या सहकार्याने ए. के. मुनशी योजना संस्थेस प्रतिनिधित्व मिळाले होते. जे. टी. शेठ मंदबुद्धी विकास केंद्राचे मुख्याध्यापक अजितकुमार चांगण यांनी भारतीय निर्यात संघटना महासंघ यांचे आभार व्यक्त केले.



महाराष्ट्र जीत

अलिबाग तालुक्यातील बहिरेश्वर मत्स्य व्यवसाय विकास मच्छिमार सहकारी संस्था धेरंड मर्यादित मच्छिमार संघटनेच्या विविध मागण्यांसंदर्भात राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील यांच्यासह मच्छिमार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## चित्रलेखा पाटील यांच्या तर्फे बांधण येथे मुलींना सायकलींचे वाटप

महाराष्ट्र जीत

**अलिबाग (रत्नाकर पाटील)**

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या, पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून अलिबाग तालुक्यातील बांधण येथे 'सावित्रीच्या लेकी चालल्या पुढे' या उपक्रमांतर्गत शालेय मुलींना सायकलींचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, संपूर्ण खारेपाटामध्ये स्वर्गीय नारायण पाटील, स्वर्गीय प्रभाकर पाटील, स्वर्गीय दत्ता पाटील यांनी विकासाची अनेक कामे केली आणि त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आम्ही त्यांची पुढची पिढी काम करत आहोत. त्यामुळे जनतेच्या कुठल्याही समस्या असतील तर त्या शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमार्फत आमच्यापर्यंत पोहोचवा किंवा आम्हाला प्रत्यक्ष भेटून आपल्या समस्या सांगा, आम्ही आपली सामाजिक बांधिलकी समजून घेवून नक्की मदत करू असा आत्मविश्वास दिला. शेतकरी कामगार पक्षाने खऱ्या अर्थाने या विभागाचा विकास केला त्या या लाल झेंड्याची सर्वांनी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करा. शेतकरी कामगार पक्षात सर्वसामान्यांचा



पक्ष आहे तो सदैव तुमच्या पाठीशी राहील असा आत्मविश्वास त्यांनी यावेळी बोलताना दिला. सायकल वाटप कार्यक्रमाप्रसंगी अनेक मुलींच्या चेहऱ्यावर सायकल मिळाल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. सदरचा कार्यक्रम बांधण येथील प्रतिज्ञा युवक क्रीडा मंडळाच्या व्यायाम शाळा प्रांगणात घेण्यात आला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे के. डी म्हात्रे ,अनंत भिंगे , महेंद्र पाटील, वसंत म्हात्रे, संदेश पवार, आनंद नाईक, अनंत नवरे, मा. सरपंच विजय पाटील, दिनेश पाटील, हरी जाधव, प्रभाकर भिंगे, कुणाल भिंगे, परशुराम पाटील, प्रकाश म्हात्रे, अंबरनाथ पाटील, अनिल पाटील, मो. रा. म्हात्रे, बाळाराम दांडेकर, मोहन मंचुके, राजेंद्र म्हात्रे आदि बहुसंख्य कार्यकर्ते महिलावर्ग कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत शेकाप कार्यकर्ते के. डी. म्हात्रे व राजेंद्र पाटील व येथील कार्यकर्त्यांनी केले.

## रायगड नागरी प्रकल्प तळा यांच्या वतीने स्तनपान सप्ताह संपन्न .

महाराष्ट्र जीत

तळा-दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी तळा नगरपंचायत हद्दीतील रायगड नागरी प्रकल्प तळा प्रकल्प पर्यवेक्षिका साधा साधना प्रसाद वांगी यांच्या मार्गदर्शनाखाली ६ ऑगस्ट २०२५ रोजी स्तनपान सप्ताहाचे आयोजित करण्यात आले होते त्या कार्यक्रमाला स्तनदा माता, स्त्री पालक वर्ग, अंगणवाडी सेविका मदतनीस,आशा सेविका सुपरवायझर तसेच ग्रामीण रुग्णालय तळा आर एच परिचारिका उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतात जेष्ठ समाजसेविका जयवंती कांबळे यांनी भूषवले तसेच स्तनपानावरील रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या व विषयावर अगंणवाडी सेविका आशा परिचारिका याने मार्गदर्शन केले. ऑगस्टचा पहिला आठवडा जागतिक स्तनपान सप्ताह दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट हा जागतिक स्तनपान सप्ताह म्हणून साजरा केला जातो याचा उद्देश मातांना स्तनपानाच्या महत्त्वा विषयी शिक्षित करणे हा उद्देश आहे. स्तनपान हे फक्त मुलांसाठीच फायदेशीर नाही तर आईला अनेक शारीरिक आणि मानसिक फायदे देखील देतात. जागतिक स्तनपान




सप्ताह १९९२ साला पासून सुरू झाला असुन त्यांचीअमंलबजावणी राज्यातकेलीजाते. आईच्या दुधामुळे मुलाचा योग्य विकास होण्यास मदत होते, या सोबतच स्तनपानासाठी शांत आणि सकारात्मक वातावरण असावे हे देखील जाणून घेणे आवश्यक आहे. स्तनपान ही नवीन मातांसाठी एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामुळे त्यांना सुरुवातीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, मात्र कधी कधी हे निराशेचे कारण देखील बनते.प्रसूतीनंतर नवीन आई अनेक टप्प्यांतून जाते. प्रसूतीनंतरचे नैराश्य, मुलाशी संबंध नसणे,मुलांच्या संगोपनाची चिंता,यासर्वगोष्टींचा स्तनपानाच्या प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. आरोग्य आणि तंदुरुस्ती आईचे दूध अमृत आहे हे एंटीबॉडी आणि एंजाइम आवश्यक पोषण प्रदान करते, जे मुलाच्या वाढीस मदत करते. ज्यामुळे त्याचाबुद्ध्यांकही वाढतो. तसेच स्तनपानाची काळजी कशी घ्यावी याबद्दल माहिती दिली याची माहिती नव माता किंवा भावी होणाऱ्या मातांना माहिती समजली जावी हा शासनाचा उद्देश असून स्तनपान सप्ताहा चे आयोजन प्रतीवर्षी केले जाते असे अंगणवाडी सेविका सरीता चांडीवकर यांनी सांगितले.या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

# देवळालीचे पर्यावरण संरक्षण करणे काळाची गरज - भोर

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प - प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

हवामान पलटण्यासाठी प्रसिद्ध असून येथील पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी काळजी गरज असल्याचे प्रतिपादन पर्यावरण आघाडीचे जिल्हाध्यक्ष तानाजी भोर यांनी केले. सेंट पैट्रीक स्कूल मध्ये पर्यावरण रॅलीचे आयोजन गुरुवार दिनांक ७ रोजी करण्यात आले असून त्याचा शुभारंभ वृक्षमित्र महाराष्ट्र शासन वनश्री पुरस्कार प्राप्त पर्यावरण आघाडीचे जिल्हाध्यक्ष तानाजी भोर यांच्या हस्ते ध्वज दाखवून करण्यात आले पर्यावरण रॅली खंडेराव टेकडी कॅन्टोन्मेंट ऑफिस झेंडा चौक मिठाई स्ट्रीट जुने बस स्टॉप मार्गे पुन्हा सेंट पॅट्रिक स्कूलमध्ये सांगता करण्यात आले यावेळी माकड म्हणतो हूप हूप झाडे लावा खूप खूप झाडे लावा पृथ्वी वाचवा बेटी बचाव बेटी पढाव झाडे लावा झाडे जगवा हम सबका एकी नारा पडणा लिखना लक्ष हमारा प्रदूषण करू नका पृथ्वीला त्रास देऊ नका हरित देवळाली सुंदर देवळाली अशा घोषणांनी देवळाली दुमदुमन निघाली यावेळी मुला मुलींनी प्रात्यक्षिके सादर केली यावेळी मॅनेजर सिस्टर मारिया डिसूजा, प्रिन्सिपल सिस्टर ब्रिजेट गोन्साल्विस , सिस्टर मॅरी क्रिस्टीना क्रीडाशिक्षक मनोज कनोजिया रोशनी परदेशी सुरेश म्हैसधुणे सुगंधा झांबरे भावना रोकडे विशाल पाटील आदी शिक्षक रॅलीसाठी मार्गदर्शन करण्यात आले

# नालीच्या पाण्याची विल्हेवाट त्वरित लावण्यात यावी

## उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठाचा न. प. ला गंभीर इशारा

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी ।**
**कारंजा**

वेदांत नगर, बायपास, कारंजा (लाड) येथील नागरिकांनी सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होण्याहेतु नगर परिषद कारंजा (लाड) प्रशासनाने योग्य विल्हेवाट लावण्याकरिता तक्रार अर्ज सादर केला. सादर तक्रार अर्जावर दि. १२ सप्टेंबर पर्यंत कार्यवाही करून नगर परिषद कारंजा यांनी अहवाल सादर करायचे आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजीच्या सुनावणी दरम्यान दिले आहे. नगर परिषद कारंजा (लाड) प्रशासनाने दि. १२ सप्टेंबर २०२५ पर्यंत योग्य कार्यवाही न केल्यास मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर गंभीर दखल घेईल असा न्यायालयाने सुनावणी सुनावणी दरम्यान आदेशीत आदेशानुसार इशारा दिला आहे. सविस्तर वृत्त असे की, वेदांत नगर, बायपास येथील परिसरात मागील ३ वर्षांपासून नगरपरिषद बांधकाम विभागाने ७५ टक्के नाली बांधकाम करून ठेवले आहे. मात्र पावसाळी पाण्याचा व दैनंदिन वापराच्या घाण पाण्याचा नगरातून कोणत्याच दिशेने कायमस्वरूपी निचरा होत नसल्याने बांधकाम केलेली नाली ही शोभेची वस्तू झाली आहे. वेदांत नगरातील या गडूळ पाण्याचा योग्यरित्या विल्हेवाट होत नसल्याने नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे गंभीर स्वरूपाचे आजार निर्माण झाले, परिणामस्वरूप नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरनीवर आला. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्यामुळे सामाजिक कार्यकर्ता हरीचंद्र मेश्राम यांनी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर येथील खंडपीठात धाव घेऊन नगरपरिषद कारंजा (लाड) विरोधात दावा दाखल केला. मौजे काळी येथील सर्वे नंबर १८२/१ क्षेत्रफळ २ हेक्टर ६८ आर, अकृषक क्रमांक रा.मा.क्र./३/३४/काळी/३/१९९९-२००० दि.२० जुन २००० रोजीचे ले-आऊट मध्ये ले आऊट मालक गजानन नाना गढवाले यांनी मंजूर आदेशातील नकाशा प्रमाणे कॉलनी जोड रस्ता करून देण्याचे बंधनकारक असताना केलेला नाही. त्यामुळे कायदा, अधिनियम १९६९ कलम १३८ चा भंग केल्याने वेदांत नगरातून वाहणाऱ्या सांडपाण्याचा निचरा थांबलेला आहे. याचिकाकर्ता हरीचंद्र मेश्राम यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद कारंजा यांच्या विरोधातील मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या दाखल रीट याचिकेत अधिनियम १९६९ कलम १३८ चे ले-आऊट मध्ये दुरुस्ती करून जे कॉलनी जोडरस्ता नकाशा प्रमाणे पश्चिमेस भुखंड क्र.८९, ८९ उत्तरेस भूखंड क्र १४,१५,१६,५३व ८० दक्षिणेस भुखंड क्र ६८,६९ हे भुखंड नकाशाच्या रेकॉर्ड वरून संबंधित महसूल विभागाकडे पाठपुरावा करून सदरहू रेकॉर्ड वरून कमी करुण्याचा आदेश पारित करावा, याप्रमाणे मागणी केली आहे. जेणेकरून कॉलनी जोडरस्ता आम रहदारी करिता खुला व मोकळा होईल व नगरातील पावसाळ्याचे वदैनंदिन वापराच्या गढूळ पाण्याचा कायमस्वरूपी विल्हेवाट लागेल अशी मागणी उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचीकेद्वारे केली आहे.

# सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभागाकडून

## गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल वाटप

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

भंडारा, : महाराष्ट्र राज्यामध्ये पादत्राने दुरुस्ती करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला बसुन आपली सेवा देत असतात. या व्यावसायिकांना वारा, ऊन, पाऊस यांच्यापासुन संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी याकरिता सामाजिक न्याय विभागामार्फत 100 टक्के शासकीय अनुदानावर गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉल पुरविणे योजना ग्रामपंचायत व एक वर्ग नगरपलिका क्षेत्रासह सदर योजनेची व्याप्ती वाढवुन अ वर्ग व ब वर्ग नगरपालिका क्षेत्रात सदर योजना राबविण्याच्या निर्णय सण 2007-08 पासून शासनाने घेतलेला आहे. सदर योजनेअंतर्गत गटई कामगारांना 100 टक्के अनुदानावर मोफत पत्र्याचे स्टॉल व रु. 500/- चे अनुदान दिले जाते. सदर




योजनेसाठी खालील अटी व शर्ती विहीत करण्यात आलेल्या आहेत.

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2) अर्जदार अनुसुचित प्रवर्गातील चांभार जातीचा असावा.

3) अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागात रुपये 40,000/- व शहरी भागात रुपये 50,000/- पेक्षा अधिक नसावे.

**4)अर्जदाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी नसावे.**

5) अर्जदार ज्या जागेत गटई स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका छावणी बोर्ड किंवा महानगरपालिका यांनी त्यास भाड्याने, कराराने, खरेदीने अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा मी त्याची स्वमालकीची असावी.

6) एखाद्या लाभार्थ्यांना स्टॉलचा ताबा दिल्यानंतर त्या स्टॉलची देखभाल दुरुस्ती इत्यादी बाबी लाभार्थ्यांने स्वतः करणे आवश्यक राहील.

7) गटई पत्र्याचे स्टॉल हे एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला दिले जाईल.

8) स्टॉल वाटपाबाबतचे पत्र लाभार्थ्यांच्या फोटोसह स्टॉलमध्ये प्रथम दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील.

9) एकदा गटई स्टॉलचे वाटप झाल्यानंतर सदर स्टॉलची विक्री करता येणार नाही.

10) अर्जदार हा रस्त्याच्या कडेला बसून गटई कामगाराचा व्यवसाय करित असल्याचा पोस्टकार्ड साईज फोटो जोडावा.

11) ग्रामपंचायत/नगरपालिका यांचे रस्त्याच्या कडेला बसून गटई कामगाराचा व्यवसाय करण्यास व त्याकरिता स्टॉल देण्यासंबधी अर्जाचा नमुना जोडलेले नाहरकत प्रमाणपत्र जोडावे.

वर उल्लेखित अटीचे अधिन राहुन ज्या लाभार्थ्याला या योजनांचा लाभ द्यावयाचा असेल त्यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा,डॉ. बाबासाहेब सामाजिक न्याय भवन, जिल्हा परिषद चौक,भंडारा या कार्यालयाशी संपर्क साधावा व अर्जाचा नमुना विनामुल्य प्राप्त करुन घ्यावा.अर्ज परिपूर्ण व आवश्यक कागदपत्रासह सादर करावी

# नांदगाव तालुक्यातील दलित महिलेवर अन्याय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा - महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे..

महाराष्ट्र जीत

नाशिक (प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे

भिमटोला सामाजिक संघटना यांच्या वतीने नाशिक जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी श्री. बाबासाहेब पारधे यांची भेट घेऊन वरील विषयाचे निवेदन दिले..

निवेदनाचा आशय असा आहे की मौजे बोलठाण तालुका नांदगाव जिल्हा नाशिक येथील रहिवाशी सौ.लक्ष्मीबाई एकनाथ गायकवाड यांच्या मालकीचे गट नंबर 310 ही शेतजमीन असून त्यांच्या मालकी हक्काचे दस्त व कागदपत्रे असतानाही तेथील काही गुंड प्रवृत्तीचे लोक जमिनीत येण्यास मज्जाव करून जीवे ठार मारण्याची धमकी देतात यापूर्वी ह्या गावगुंडांवर अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल असूनही ते पीडीतेला मारहाण करून शेतात येण्यास मज्जाव करतात ह्या सर्व गंभीर बाबीकडे सरकारने लक्ष न दिल्यास लवकरच विभागीय महसूल आयुक्त कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईल..याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष




महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे, प्रदेशाध्यक्ष विकीभाई भोळे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष यशवंत (टिल्लूभाई) साळवे, शहराध्यक्ष विशालभाऊ वाघमारे, महिला आघाडी नेत्या लक्ष्मीबाई गायकवाड, कुणालजी शर्मा, मयूर चव्हाण, युवा नेते प्रशांतजी गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते..!*

# विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात स्टुडन्ट इंडक्शन कार्यक्रम संपन्न...

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप**




इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब ता. इंदापूर जि. पुणे महाविद्यालयातील वाणिज्य विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी स्टुडन्ट इंडक्शन प्रोग्राम (Student Induction Program) संपन्न झाला. सदर कार्यक्रमामध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० अभ्यासक्रम ओळख, श्रेयांक पद्धती, अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट,राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ, परीक्षा आयोजन नियोजन , ग्रंथालय सुविधा, संगणक प्रयोगशाळा, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम, सांस्कृतिक सहभाग या विषयावर प्रा. योगेश खरात,प्रा.अभिजीत शिंगाडे,प्रा. राजेंद्रकुमार डांगे, डॉ. रामचंद्र पाखरे, प्रा. विनायक शिंदे, डॉ. सुहास भैरट, प्रा. विद्या गुळीग यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. नितीन रूपनवर, प्रा. ज्ञानेश गवळी, प्रा.सोनाली चव्हाण, डॉ. विनोद देशमुख यांचे सहकार्य लाभले. वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विलास बुवा व माजी प्रभारी प्राचार्य. डॉ. विजय केसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# मोखाड्यातील 42 रोजगार सेवक बेमुदत संपावर

## 5 महिन्यांपासून मानधनाची प्रतिक्षा ऐन पावसाळ्यात उपासमारीची वेळ

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्र जीत: दयानंद शिंदे

मोखाडा तालुक्यातील 27 ग्रामपंचायत क्षेत्रात कार्यरत असलेल्या 42 रोजगार सेवकांना माहे डिसेंबर 2024-25 या आर्थिक वर्षापासून आजतागायत तब्बल 5 महिन्यांचे मानधनच अदा करण्यात आलेले नाही. परिणामी रोजगार सेवकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे.परिणामस्वरुप 42 रोजगार सेवकांनी बुधवार दिनांक 5 ऑगस्ट पासून संपाचे हत्यार उपसले असून नरेगाचे काम थांबवले आहे.त्यामूळे नरेगाशी निगडीत सर्व विभागांच्या रोहयोच्या



कामांना प्रदीर्घ खिळ बसणार असून त्याचे दुरगामी परिणाम मात्र मजूरांच्या कुटूंबाला आणि बालबच्च्यांना भोगावे लागणार आहेत. सन 2006 पासून रोजगार सेवक नरेगाचे काम प्रामाणिकपणे करत आहेत.सातत्याने मानधन प्रलंबित रहात असल्याने कौटुंबिक वातावरण ढवळून निघत असून अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचे रोजगार सेवक सांगत आहेत.माहे डिसेंबर पासून आजतागायत सलग 5 महिने मानधन मिळाले नसल्याने केवळ नाविलाजास्तव संप करावा लागत असल्याने शासनाने तातडीने दखल घेऊन आमचे मानधन एकरकमी अदा करावे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.त्याशिवाय 2 वर्षापासुनचा प्रवास व अल्पोपहार भत्ता त्वरीत देन्यात यावा , नवीन शासन निर्णया नुसार मानधन देन्यात यावे आदि मागण्यांचे निवेदन तालुक्यातील रोजगार सेवकांनी वरिष्ठांना सादर केले आहे. तालुक्यातील मजुरांची मजूरी थोडीबहुत वगळता जवळपास अदा करण्यात आलेली आहे.तथापी नरेगा योजनेचा कणा असलेल्या रोजगार सेवकांनी प्रामाणिकपणे काम करुन देखील त्यांना मागील 5 महिन्यांपासून एक छदामही देण्यात आलेला नाही.त्यामूळे एकूणच रोजगार सेवकांनी योजनेकडे पाठ फिरवली असल्याने मजुरी मिळेल तेव्हा मिळेल पण कामाच्या आशेवर कुटूंब कबिल्यासह तालुक्यातच तग धरून राहिलेल्या मजुर वर्गाच्या हाताला काम मिळणे दुरापास्त होणार आहे.त्यामुळे शासनाने रोजगार सेवक आणि पर्यायाने मजुरांच्याही योघगक्षेमाचा तातडीने विचार करून मानधन अदा करण्याबाबत उपाययोजना करावी अशी मागणी सर्वच थरातून केली जात आहे.

**मोडून पडला कणा, आता तरी मानधन द्या ना !**

तब्बल 6 महिने इतकी प्रदीर्घकाळ मानधनाची प्रतिक्षा करावी लागत असल्याने आम्ही कुटूंबांचा चरितार्थ चालवण्यासाठी अक्षरशः स्त्रीधनही गहाण ठेवले आहे. त्यात आमचे बारीक - सारीक कर्जाचे हफ्ते थकले असून अत्यंत हलाखीत लाजिरवाणे जीवन जगावे लागत असल्याने आत्ता आमचा कणाच मोडून पडण्याची वेळ आली असल्याने मायबाप शासनाने आत्ता तरी आमचे थकीत मानधन अदा करावे.

**भगवान कचरे**
**तालुका उपाध्यक्ष तथा**
**रोजगार सेवक,**

# 8 ते 15 ऑगस्ट दरम्यान “हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता”अभियान

## आजपासून जिल्हाभरात शुभारंभ, दररोज राबविणार विविध उपक्रम

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

महाराष्ट्र जीत

**भंडारा, :-.** या वर्षीच्या 79 व्या स्वातंत्र्यदिना निमित्त “हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता” स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग या संकल्पनेसह जल जीवन मिशन व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एक विशेष स्वच्छता व जनजागृती मोहीम ८ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करताना नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे आणि समाजात शाश्वत स्वच्छता सवयी बिंबविणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग होऊन यशस्वी करावी असे आवाहन भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे यांनी केले आहे.

हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता” स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग या संकल्पनेसह आयोजित अभियानांतर्गत दररोज विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रत्येक दिवशी खास उद्दिष्ट ठेऊन ग्रामस्थ, विद्यार्थी, स्वयंसहायता समूह, विविध संस्था, अधिकारी, लोकप्रतिनिधी यांचा डॉ सहभाग राहणार आहे.

**. 08 ऑगस्ट : मोहिमेचा शुभारंभ**

जिल्हा, तालुका व ग्राम पंचायतस्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हस्ते अभियानाचा औपचारिक शुभारंभ होईल. गावातील प्रमुख प्रवेशद्वार, शाळा परिसर, अंगणवाडी येथे स्वच्छता करून मोहीमेचा श्रीगणेशा करण्यात येईल. शुभारंभाच्या दिवशी नागरिक,




विद्यार्थ्यांना स्वच्छ सुजल गावाची प्रतिज्ञा देण्यात येणार आहे.

**9 ते 11 ऑगस्ट : सार्वजनिक स्वच्छता मोहीम**

सार्वजनिक शौचालये, कचराकुंड्या, प्लास्टिक संकलन केंद्र, रस्ते, नाल्या, अंगणवाडी व शाळा परिसर इ. ठिकाणी स्वच्छता मोहीम आयोजित करून मोहिमेमध्ये स्वयंसहायता बचतगट, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, शालेय विद्यार्थी, युवक, नागरिकांचा यांचा सहभाग घेण्यात येईल. प्लास्टिक कचरा संकलन व व्यवस्थापनासंबंधी तपासणी करण्यात येणार आहे. आझादी का श्रमदानांतर्गत सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता व सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याची गळती शोधणे व थांबविण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. गावातील युवक, विद्यार्थ्यांची स्वच्छता रॅली काढली जाईल. तसेच वैयक्तिक स्तरावर रांगोळी काढणे व स्वच्छता घटकांची रंगरंगोटी करण्यात येईल.

**12 ऑगस्ट : WASH सुविधा स्वच्छता दिन**

जल जीवन मिशनच्या घटकांतील पाणीपुरवठा स्थळांची व नळ जोडण्या, टाक्या, स्त्रोत, वीज पंप हाउस यांची रंगकाम व स्वच्छता करण्यात येईल. देशभतीपर थीमसह पाणी व स्वच्छता स्थळांचे रंगकाम व सजावट करण्यात येईल. वॉश (WaSH) स्थळांवर तिरंगी धागे बांधणे.

**13 ऑगस्ट : स्वच्छता संवाद आणि जनजागृती दिन**

कचरा व्यवस्थापन, शौचालय देखभाल दुरूस्ती, जल संवर्धन, भूजल पूनर्भरण, जलस्त्रोत संरक्षण, एकल प्लास्टिक वापर टाळणे बाबत व्यापक जनजागती करण्यात येईल. स्वच्छतेबाबत आव्हाण व उपाययोजना या विषयावर सभा व चर्चा आयोजित केली जाईल.

**14 ऑगस्ट : स्वातंत्र्य दिनाची तयारी**

ग्रामपंचायत हद्दीत सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, बाजारपेठा, शाळा व वॉश स्थळांची स्वच्छता सजावट आणि ध्वजारोहणासाठी ठिकाण निश्चित करणे."हर घर तिरंगा" अभियानांतर्गत घरोघरी झेंडा लावण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

**15 ऑगस्ट : स्वातंत्र्य दिन साजरा करणे.**

ग्रामपंचायत कार्यालय, शाळा व शासकिय कार्यालयावर ध्वाजारोहणासोबतच जलस्त्रोत व स्वच्छता स्थळे, हर घर तिरंगा मोहिमेतंर्गत वैयक्तिक कुटूंब स्तरावर ध्वाजारोहण करण्यासोबतच “स्वच्छता शपथ”व स्वयंसेवकांचा सन्मान करण्यात येईल. या मोहिमेमुळे ग्रामीण भागात स्वच्छतेबाबतची नागरिकांच्या सहभागातून व्यापक जनजागृती केली जाणार आहे. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन "हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता" मोहिम यशस्वी करावी असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंदकुमार साळवे यांनी केले.

# पुणे जिल्हा मिक्स बॉक्सिंग राज्यस्तरीय स्पर्धा 2025

महाराष्ट्र जीत

**पुणे प्रतिनिधी श्याम जगताप**

27 जुलै 2025 रोजी आपल्या तालुका संकुल मध्ये पुणे जिल्हा मिक्स बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय स्पर्धेसाठीचे पुणे जिल्हा निवड चाचणी पार पडली. या स्पर्धेचे आयोजन मुळशी तालुका मिक्स बॉक्सिंग असोसिएशन यांनी केलं होतं. आपल्या पुणे जिल्हा मधील विद्यार्थ्यांना त्याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा. येणाऱ्या शालेय स्पर्धेत त्यांनी अधिकाधिक पदके मिळवावे यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये पुणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील 270 विद्यार्थ्यांमध्ये ही स्पर्धा पार पडली. या विद्यार्थ्यांमधून प्रथम. द्वितीय व तृतीय क्रमांकास प्रशस्तीपत्र व मेडल देण्यात आले.व यात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड पुणे जिल्ह्याकडून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली.यात प्रमुख पाहुणे मिक्स बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांचे सचिव श्री सचिन शिंगोटे सर तसेच महाराष्ट्र मिक्स बॉक्सिंग अध्यक्ष श्रीमती कोमल ताई शिंदे मॅडम, पुणे जिल्हा अध्यक्ष श्री किरण डाखवे सर व महाराष्ट्र टीम कोच श्री राकेश पाटील सर आणि विजया पोळ मॅडम हे सर्व मंडळी उपस्थित होते. आयोजक मुळशी तालुका अध्यक्ष श्री युवराज सकपाळ सर यांच्या नियोजनात हि स्पर्धा उत्तमरीत्या पार पाडले.

